**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com*
***PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, SEPT-OCT, 2021, VOL- 9/67***

# रत्नागिरी तालुक्यातील कृषी पर्यटन विकास: संधी व आव्हाने

**प्रा. तुळशीदास ब. रोकडे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
गोगटे जोगळेकर महाविद्यालय रत्नागिरी

**सारांश**

कृषि पर्यटनस्थळांचे काही वैशिष्ट्ये असतात आणि त्यानुसार त्यांचे वेगवेगळे प्रकारदेखील पडतात. काही ठिकाणांना भेट देण्यामागे जर धार्मिक हेतू अधिक प्रमाणावर असतील तर त्या ठिकाणाला धार्मिक पर्यटनस्थळ म्हणून ओळखले जाते. तसेच थंड हवेचे ठिकाण, समुद्रकिना-यावरील ठिकाण, ब्रफॉवरील खेळांसाठी प्रसिध्द ठिकाण अशी विविध प्रकारची वैशिष्ट्यपूर्ण पर्यटनस्थळे आपणास माहिती आहेत.

अशा सर्व प्रकारच्या पर्यटनस्थळांचे महत्व बहुधा रिकाम्या वेळातील अथवा करमणूकीच्या दृष्टीने असते. मात्र कृषि पर्यटन स्थळांच्या प्रकारांचा विचार करताना करमणूक किंवा मनोरंजनासह ज्ञान माहिती पुरविणारे स्थळ असादेखील मुद्दा लक्षात घ्यावा लागतो आणि हेच कृषि पर्यटनाचे वैशिष्ट्य होय. कृषि पर्यटनाचे प्रकार त्यावरून पडतात.

एखाद्या शेतावर किंवा फळबागेमध्ये विश्रांती व भोजनाच्या सोयी उपलब्ध करुन देणे तसेच तेथे पूर्णपणे नैसर्गिक वातावरण राखून ठेवणे किंवा तेथे येणाया पर्यटकांना अस्सल ग्रामीण अनुभव मिळवून देणे (उदा. ग्रामीण पद्धतीचे जेवण. बैलगाडीची सफर, हुरडापार्टी इ.) अशा उपक्रमांद्वारे पर्यटकांचे मनोरंजन होवून त्याद्वारे संयोजकांना उत्पन्नदेखील मिळेल. पुणे शहराच्या आसपास काही ठिकाणी असे उपक्रम सुरु झाले आहेत. त्यांना चांगला प्रतिसाददेखील असल्याचे दिसून येते. अशा प्रकारे पर्यटन, करमणूक आणि निसर्गसानिध्य अशा विविध प्रकारांनी करमणूक पर्यटनस्थळ उपयुक्त असते.

**कळीचे शब्द :** पर्यटन , कृषी पर्यटन , आर्थिक विकास

**संशोधन विषयाची उद्दिष्टे**

१. कोकणातील शेती पूरक उत्पन्नाचे मार्ग म्हणून कृषी पर्यटन या विषयाचे अध्ययन व अवलोकन करणे.

२ . कृषी पर्यटन उभारणी त्याचे ,नियोजन आणि आवश्यकता यांचा अभ्यास करणे. जाणून घेणे.

३ . भविष्यातील संधी, काळा समोर येणारी नवी आव्हाने ,मजूर उपलब्धता आणि यातून मिळणारा नफा याचे गणित मांडले व प्रकल्पाची उपयोजकता समाजाला पटवून देणे.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**संशोधन विषयाची गृहीतके**

१. कोकणातील कृषी पर्यटन हा दुर्लक्षित व्यवसाय आहे त्यामुळे त्यातील गुंतवणूक कमी आहे.

२ . कोकण विभागात सहकार रुजलेला नसल्याने संघटनात्मक कृषी पर्यटन व्यवसाय अत्यल्प आहेत.

३ कोकणात दळणवळणाच्या साधनांना मर्यादा असल्याने विस्तार संकुचित आहे. व्यवसाय अडचणीत मर्यादा असल्याने ,उत्पन्नास परिणामी मर्यादा आहेत.

**संशोधन पद्धती:-** संशोधन पद्धती अवलंब करताना मुख्यत्वे वैयक्तिक अनुभवा आधारित माहिती संकलन, सर्वेक्षण पद्धती, मुलाखत पद्धती, प्रश्नावली, त्याचप्रमाणे प्रत्यक्ष भेट देऊन व्यवसायिकांची मानसिकता त्यांचा कल आणि त्या अनुमानाने काढलेले निष्कर्ष असा नाना विविध पद्धतींचा अवलंब यात केला आहे .

**कृषी पर्यटनस्थळांचे प्रकार:-** कृषी पर्यटन स्थळांचे काही वैशिष्ट्ये असतात आणि त्यानुसार त्यांचे वेगवेगळे प्रकार देखील पडतात .काही ठिकाणांना भेट देणा मागे अधिक प्रमाणावर असतील तर त्या ठिकाणाला धार्मिक पर्यटन स्थळ म्हणून ओळखले जाते. तसेच थंड हवेचे ठिकाण, समुद्रकिनाऱ्यावरील ठिकाण, बर्फावरील खेळांसाठी प्रसिद्ध ठिकाण अशी विविध प्रकारचे वैशिष्ट्यपूर्ण पर्यटन स्थळे आपणास माहिती आहेत.

अशा अशा सर्व प्रकारच्या पर्यटन स्थळांचे महत्त्व बहुदा रिकामे वेळेतील अथवा करमणुकीच्या दृष्टीने असते. मात्र कृषी पर्यटन स्थळांच्या प्रकारांचा विचार करताना करमणूक किंवा मनोरंजन होऊन ज्ञान माहिती पुरविणारे स्थळ असादेखील मुद्दा लक्षात घ्यावा लागतो आणि हेच कृषी पर्यटनाचे वैशिष्ट्य होय. कृषी पर्यटनाचे प्रकार त्यावरून पडतात .

**पर्यटन स्थळ:-** आपल्या देशात जवळपास प्रत्येक राज्यामध्ये कृषी विद्यापीठ तसेच अन्य कृषी संशोधन शिक्षण संस्था आहेत. महाराष्ट्रामध्ये तर चार कृषी विद्यापीठे आहेत. ही चार कृषी विद्यापीठे राज्याच्या चार विभागाअंतर्गत काम करतात. त्या त्या विभागाची वैशिष्ट्ये आणि गरजांनुसार तेथे कृषी संशोधन, शिक्षण व विस्ताराचे काम चालते. विद्यापीठाच्या मुख्यालयाला भेट दिल्यामुळे कृषी विषयक सर्व संबंधित घटकांची माहिती उपलब्ध होऊ शकते.

कार्यक्षेत्रातील प्रदेशासाठी उपयुक्त असलेल्या पिकांबद्दलचे नवीन संशोधन कार्य देखील कृषी विद्यापीठ सुरू असते. असे संशोधन करण्यासाठी योग्य ठिकाणी संशोधन केंद्र स्थापन केलेली आहेत. त्याचबरोबर राज्यातील विविध कृषी हवामान विभागांमध्ये कृषी संशोधनाद्वारे निर्माण झालेले संबंधित विषयाचे नवीन ज्ञान व माहिती विविध माध्यमांद्वारे सर्वसामान्य शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली जाते.

ज्या व्यक्तींना कृषी शेतातील नवीन तंत्रज्ञानाची वा प्रगतीची माहिती आवश्यक आहे. अशा व्यक्ती कृषी विद्यापीठे वा संशोधन केंद्रांना भेट देतीलच, परंतु मनोरंजनासाठी पर्यटन करणाऱ्या व्यक्तींना देखील त्या ठिकाणच्या आसपासच्या कृषी संशोधन केंद्राला भेट दिल्यास त्यांना समाधान मिळेल.

आज वाढत्या शहरीकरणामुळे मनुष्य निसर्गापासून दुरावत चालला आहे. अशा परिस्थितीमध्ये अनेकदा फावल्या वेळी मध्ये पुन्हा निसर्गाच्या सानिध्यात काही काळ राहावे असे अनेक जणांना वाटते. त्यासाठी गिरिस्थान समुद्रकिनाऱ्यावर काही दिवस राहणे हा एक जुना लोकप्रिय प्रकार आहे. आवश्यक अशा पायाभूत सुविधा निर्माण करून अशाप्रकारे कृषी पर्यटन स्थळ देखील विकसित करता येईल.

एखाद्या शेतावर किंवा फळ बागेमध्ये विश्रांती व भोजनाच्या सोयी उपलब्ध करून देणे तसेच तेथे पूर्णपणे नैसर्गिक वातावरणात राखून ठेवण्याची किंवा तेथे येणाऱ्या पर्यटकांना अस्सल ग्रामीण अनुभव मिळवून देणे अशा उपक्रमांनी वादे पर्यटकांचे मनोरंजन होऊन त्याद्वारे संयोजकांना उत्पन्नदेशील मिळेल. पुणे शहराच्या आसपास काही ठिकाणी असे उपक्रम सुरू झाले आहेत. त्यांना चांगला प्रतिसाद देखील असल्याचे दिसून येते. अशाप्रकारे पर्यटन कदम आणि निसर्ग सान्निध्य अशा विविध प्रकारांनी करमणूक पर्यटन स्थळ उपयुक्त असते.

**कोकणातील पर्यटनस्थळांचे व्यवस्थापन:** पर्यट्न हा उद्योग असल्याने इतर उद्योगांप्रमाणेच त्यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन करणे आवश्यक असते. त्यामध्ये अनेक प्रकारच्या सेवासुविधांचा समावेश होतो. हे आपणास माहित आहे. व्यवस्थापनाच्या दृष्टीने काही महत्वाच्या बाबींची माहिती पुढील दिली आहे.

निवास,भोजन , खानपान वाहतूक , प्रवास मनोरंजन , करमणूक इतर

हॉटेल, लॉज, विश्रामधाम, उच्चश्रेणी हॉटेल, साधारण हॉटेल, वैशिष्ट्यपूर्ण हॉटेल, घरगुती हॉटेल, भोजनालय, फास्टफूड केंद्र, विमान, रेल्वे, बस, जहाज खाजगी वाहून उपलब्धता, प्रवास दौरा मार्गदर्शन , यात्रा , सहल आयोजन , वैयक्तिक सहली आयोजक , स्थलदर्शन, जलक्रीडा , गोल्फ, मैदानी खेळ, व्हिडीओ पार्लर , फिटनेस सेंटर

भेटवस्तूंचे दुकान, आरोग्य सुविधा, चलन विनिमय, संपर्कसुविधा , टपालकुरियर (फोन /फॅक्स) इंटरनेट इत्यादी

पर्यटनासंबंधित सेवांचे चार प्रमुख विभागामध्ये वर्गीकरण करता येऊ शकते. हे वरील तक्त्यावरून आपल्या लक्षात येईल. त्याप्रत्येकाबद्दल आपण थोडक्यात माहिती निवास/भोजन/खानपान सेवा हा विभाग सर्वात महत्वाचा समजला जातो. पर्यट्कांच्या आर्थिक कुवतीनुसार तसेच त्यांच्या गरजांनुसार ठराविक पद्धतीची निवास व भोजन सुविधा उपलब्ध करुन देणे, ही पर्यटनस्थळ व्यवस्थापनातील महत्वाची बाब आहे.

वाहतूक/प्रवास सुविधांचा व्यवस्थापनाची गरज सर्व टप्प्यांवर असते. त्यामध्ये प्रामुख्याने प्रवासाच्या सुरुवातीचे व परतीचे आरक्षण यांचा समावेश होतो. तसेच स्थलदर्शनाच्या वेळेला आवश्यकतेनुसार स्थानिक प्रवास/ वाहतूकीच्या सोयी उपलब्ध करून देणे, याचादेखील समावेश होतो. मनोरंजन/ करमणूकीसाठी विविध खेळ. स्थलदर्शक यांचा समावेश होतो.

पर्यटनसेवांमधील ही एक उपयुक्त सेवा आहे. पर्यटकांना उपलब्ध असलेल्या वेळेमध्ये जास्तीतजास्त ठिकाणे बघता यावीत व त्याचा ताणदेखील जाणवणार नाही, असे कौशल्यपूर्ण नियोजन या सेवेसाठी आवश्यक असते. इतर पूरक सुविधेमध्ये खरेदीची ठिकाणे, चलन विनिमय, संपर्कसेवा यांसारख्या सेवा अंतर्भूत असतात. अशाप्रकारे कृषि पर्यटनस्थळांच्या निर्मितीमध्ये मुलभूत सेवा-सुविधांचा व विविध घटकांचा समावेश आपणास करता येईल.

कृषी पर्यटन हा भविष्यातील पुढे येणारा आणि संपूर्ण परिसंस्था उभा करेल अशा तिचा विषय आहे पारंपारिक बागायाती आणि खरीप हंगामातील पोटापुरती शेती या शेतकरी बंधूंना आहे परंतु बदल करणारे प्रयोग गावातील शेतकरी कोकणात होताना दिसत आहेत .याचा आढावा घेणे, अभ्यास करणे व त्याचे महत्त्व मान्य आहे व अभ्यास करण्यासारखे आहे. कोकण, गोवा किंवा केरळ या ठिकाणी पैशाची कमतरता नाही ते समान संधी आहेत कृषी पर्यटन करणारी प्रयोगशील शेतकरी सुद्धा दिसून येत आहे.

पर्यटन सेवांमधील ही एक उपयुक्त सेवा आहे. पर्यटकांना उपलब्ध असलेल्या वेळेमध्ये जास्तीत जास्त ठिकाणी बघता यावेत व त्याचा ताण देखील जाणवणार नाही, असे कौशल्यपूर्ण नियोजन या सेवेसाठी आवश्यक असते पूरक सुविधेमध्ये खरेदीची ठिकाणे, चलन विनिमय, संपर्क सेवा यांसारख्या सेवा अंतर्भूत असतात. अशाप्रकारे कृषि पर्यटन स्थळांच्या निर्मितीमध्ये मूलभूत सेवा सुविधांचा व विविध घटकांचा आपणास करता येईल.

कृषी पर्यटन विकास होण्यासाठी कोणत्या घटकांची आवश्यकता आहे :-

१. आपल्या शेतीला कृषी पर्यटन केंद्र चालू करण्यासाठी सखोल मार्गदर्शन करेल.

२. कृषी व ग्रामीण पर्यटन सुविधा तसेच निवास व्यवस्था, रस्ते व पायाभूत सुविधा उभारण्यासाठी राष्ट्रीयकृत बँका, संस्था तसेच शासकीय संस्था द्वारे आर्थिक सहाय्यासाठी मदत व मार्गदर्शन.

३. कृषी व ग्रामीण पर्यटन व्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रम.

४. विक्री, विपणन व व्यवसाय वृद्धीसाठी मार्गदर्शन.

५. शहरी भागातून आपल्या कृषी पर्यटन केंद्रावर सहलींचे आयोजन.

६. उत्कृष्ट कृषी पर्यटन केंद्र चालकांचा"जागतिक कृषी पर्यटन गौरव पुरस्कार"देऊन गौरव.

७. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय कृषी पर्यटन केंद्रांचा अभ्यास दौरे / भेटींचे आयोजन.

८. सोशल मीडिया च्या माध्यमातून वेळोवेळी कृषी पर्यटन विषयक माहिती आपल्यापर्यंत पोचविणे.

९.कृषी पर्यटन कर्ज योजनेसाठी प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करणे.

भारतात कृषी पर्यटन सुरू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे, आज मितीस 400 पेक्षा जास्त कृषी पर्यटन केंद्र अस्तित्वास असून मागच्या आर्थिक वर्षात या कृषी पर्यटन केंद्रांना आठ लाख पर्यटकांनी भेटी दिल्या असून रुपये 18 कोटीचे अतिरिक्त उत्पन्न कृषी पर्यटन केंद्र चालकांना मिळाले आहे. पाच हजार लोकांना या माध्यमातून रोजगार मिळाला आहे, गावातील महिला बचत गट युवक, कारागीर, कलाकार या सर्वांना कृषी पर्यटनाला येणाऱ्या पर्यटकांनी जास्त फायदा झाला आहे. त्यामुळे कृषी पर्यटन हे गावाला पूरक व्यवसायाचे जाळे निर्माण करणारा शेती आधारित उपक्रम आहे. जगभरातील देशांनी पर्यटन शेतकरी खूप गांभीर्याने घेतले आहे. आशिया खंडातील कित्येक दक्षिण अन्य देशाची आर्थिक उलाढाल फक्त पर्यटनाच्या जोरावर सुरू आहे, त्या सर्व देशांचे पर्यटन धोरण खूप आहे. आपल्या देशात महाराष्ट्र राज्य कृषी पर्यटन चळवळ सुरू करणारे पहिले राज्य आहे. कृषी पर्यटनाच्या माध्यमातून न व युवकांना रोजगाराच्या विविध संधी आणि फायदे ही आहेत. त्यामध्ये शेती,शेतकरी आणि शिवार स्वच्छ राहते. कृषी संस्कृतीचे जतन व संवर्धन होते. ग्रामीण परिसरातील पर्यावरणाचे जतन व संवर्धन होत आहे. ग्रामीण भागातील युवक, महिला तसेच महिला बचत गटातील महिलांनी बनवलेले पदार्थ यांना गावातच बाजारपेठ उपलब्ध होत आहे. नवीन पिढीतील युवकांना रोजगाराची मोठी संधी आपोआपच उपलब्ध होते. पारंपारिक शेतीबरोबरच पर्यटन केंद्र उभारून आर्थिक शाश्वत उत्पन्न मिळत आहे.

महाराष्ट्र राज्यात नवीन पर्यटन धोरण 2016 ला अस्तित्वात आले असून, कृषी पर्यटनाला चालना देण्यासाठी म्हणाव्यात तितक्या उपाययोजना केलेल्या दिसून येत नाहीत, कृषी पर्यटन केंद्र यांचे मार्केटिंग शासन स्तरावर होणे गरजेचे आहे, जगभरातील वेगवेगळ्या पर्यटन प्रदर्शनात कृषी पर्यटन केंद्र चालकांना मोफत टेबल स्पेस दिली पाहिजे.

जागतिक कृषी पर्यटन दिन सोहळा मे हा दिवस आंतरराष्ट्रीय पर्यटन महोत्सव पत्रिके मध्ये समाविष्ट केला असून आज जगभर त्याची व्याप्ती वाढताना दिसत आहे. 16 मे हा जागतिक कृषी पर्यटन दिन, महाराष्ट्र पर्यटन विभागाने मोठ्या प्रमाणात साजरा केला पाहिजे, उत्कृष्ट कृषी पर्यटन केंद्र यांना पुरस्कार दिले पाहिजे.

शेतात जाऊन शेती आणि शेतीविषयक बाबींचा अनुभव घेऊन अभ्यास करणे. स्वतः शेती पूरक अवजारे चालवून चुलीवरच्या जेवणाचा आस्वाद घेणे, निवांत झाडा खाली पडणे, रात्री मोकळ्या आकाशातील चांदण्या यांचा अनुभव घेऊन भोजनाचा आस्वाद घेणे, शेकोटी करणे. याच बरोबर शहरातील पर्यटकांना शेतकऱ्यांच्या कष्टाची माहिती देऊन लोकजीवन आणि लोककलेचा उलगडा करणे. रत्नागिरी जिल्ह्यात पर्यटनाचे माहेरघरच आहे. सह्याद्रीच्या कुशीत वसलेली गावे व त्यामध्ये असणारा निवांतपणा, नयन रम्य समुद्रकिनारा पाहिल्यास या सर्वच ठिकाणी कृषी पर्यटन केंद्रे उभारण्यास मोठा वाव आहे. याचा शेतकरी आणि पर्यटक अशा दोघांनाही फायदाच आहे.

**कृषी व ग्रामीण पर्यटन समृद्ध शेतीचा राजमार्ग:** कृषी पर्यटन म्हणजे "कृषी व पर्यटन" या दोन विभागाचा समन्व्य आहे. जेथे पर्यटक शेतांना भेट देतील , शेतीच्या विविध पैलूंचे दर्शन व अनुभव घेतील, ताजा भाजीपाला , फळे, खरेदी करू शकतील प्रदूषण मुक्त वातावरणाचा आनंद घेऊ शकतील, ग्रामीण भारतीय भोजनाचा तसेच जागरण, गोंधळ, भारूड, कीर्तन, प्रवचन, अशा पारंपरिक लोक कलांचा अनुभव व आनंद घेऊ शकतील. पुन्हा ताजे तवाने होऊन आपल्या शहराकडे जाऊ शकतील. शहरी व ग्रामीण या मध्ये असलेली दारी कमी होईल. ग्रामीण भागातील माणूस शहराशी जोडला जाईल. शहरातील मुलांना गावाकडे आपल्या मामाचे घर मिळेल. शहरातील पैसा ग्रामीण भागात विखुरला जाईल व आपले गाव निश्चित स्वयंपूर्ण होईल. या साठी कृषी पर्यंटन विकास संस्था १३ वर्षांपासून काम करत असून महाराष्ट्र राज्यात ३५० पेक्षा जास्त कृषी व ग्रामीण पर्यटन केंद्र संस्थेच्या माध्यमातून शेतकऱयांच्या शेतावर सुरु केली आहेत. कृषी पर्यटन केंद्रांची संख्या मोठ्या प्रमामाणावर वाढत असून पर्यटकांचा मोठा कल कृषी व ग्रामीण पर्यटनाकडे आहे. सन २०१५-२०१६ या एक वर्षात जवळपास २३ लाख पर्यटकांनी कृषी व ग्रामीण पर्यटनाला भेटी दिल्या असून ३५.७९ कोटी रुपयाची उलाढाल एका वर्षात झाली आहे. याचा अर्थ कृषी व ग्रामीण पर्यटनाला मोठा वाव व संधी आहे.

**निष्कर्ष**

१. कृषी पर्यटन येणाऱ्या काळात जास्तीत जास्त नफा आणि कोकणासाठी व्यवसायासाठी उत्तम संधी देणारा व्यवसाय ठरणार आहे.
२. अनेक शेतकरी केवळ शेतीभिमुख कार्य करत अर्थ प्राप्ती करत आहेत , त्यांना व्यवसाय भिमुख उत्पन्नाकडे वळणे यासाठी जागृती आणि त्याचे गणित समजणे आवश्यक आहे.
३. १२ महीने पूर्ण क्षमतेने प्रकल्प चालणे आणि त्यासाठी पर्यटक आकर्षित करणे ही मुख्य बाब असली पाहीजे यासाठी शासकीय पाठबळाची गरज आहे. अनेक युवकांना रोजगाराची नवीन संधी यातून निर्माण होऊ शकते.

जर आपण कृषी पर्यटन या संकल्पनेचा विचार केला तर यामध्ये कृषी व पर्यटन या दोन भागांचा समन्वय हा दिसून येतो. या संकल्पनेमध्ये शेती पर्यटक शेतांना भेट देतील, शेतीचे विविध अंगे व पैलूचे दर्शन व अनुभव घेतील

आणि शहराकडे चा कोलाहल आणि प्रदुषणमुक्त तसेच ताजे फळ व भाजीपाला खरेदी करू शकतील. रोजच्या धावपळीतून शांतता निवांत आणि निसर्गरम्य ठिकाणी जाण्याची ओढ प्रत्येकाच्या मनात असते आणि अशी वाटणारी ओढ आणि निसर्गाबद्दल से प्रेम कृषी पर्यटनाचा मूळ पाया आहे. एखाद्या प्रदेशाचा आर्थिक विकास करण्याची क्षमता कृषी पर्यटनात आहे. सुनियोजित कृषी पर्यटनाचे अनेक फायदे आहेत. कृषी पर्यटनाला प्रोत्साहन दिल्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष भरपूर फायदे होतील.

**संदर्भ सूची** –

१. हाडवळे मनोज , कृषी पर्यटन , सकाळ पब्लिकेशन
२. शिंदे एस. बी. , पर्यटन भूगोल, फडके प्रकासन , पुणे २०१२
३. घारपुरे विठ्ठल , पर्यटन भूगोल, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर
४. कृषी पर्यटन विशेषांक २००४

रत्नागिरी तालुक्यातील शीळ, आंबेशेत, आंबेकोंड , दंडेआडोम, डुगवे व धामणसे येथील शेतकरी व कृषी पर्यटन व्यावसायिक यांची प्रत्यक्ष मुलाखत विश्लेषण

www.kokankisan.com
www.vikaspedia.com
www.esakal.com
www.mhdeshaagro.com